महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/३८८/प्र.क्र.२२३/२००८/का.१, दिनांक :- २९ सप्टेंबर, २००८.

अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

झेवियर इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग सोसायटी, माहिम, मुंबई या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२४.१०.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. दि.२२.०९.२००८ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही धार्मिक (ख्रिश्चन) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी. एफ. थेकेकरा

(टी. एफ. थेकेकरा)
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: अशैसं-२००८/प्र.क्र.२२३/०८/का.१
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३०/०९/२००८.

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
झेवियर्स इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग सोसायटी,
माहिम, मुंबई.

विषय :- शैक्षणिक संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळणेबाबत.

महोदय,

अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक:अशैस-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दिनांक ४ जुलै, २००८ अन्वये आपण शैक्षणिक संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जास अनुसरुन आपल्या संस्थेचे धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मान्यतेचे प्रमाणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत : वरीलप्रमाणे.

Sanction File

महाराष्ट्र शासन

क्र.अल्पसं २००४/(३१४/०४)/तांशि-६,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक: ३ फेब्रुवारी ,२००४.

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषय:- अल्पसंख्यांक दर्जा देणेबाबत

संदर्भ:- संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पत्रे
१)क्र.२/एनजीसी/२००३/अल्पसंख्यांक दर्जा/५१२६, दि.१७ जून,२००३.
२) क्र.२/एनजीसी/२००३/८२६, दि.३ एप्रिल,२००३.
३) क्र.१०(३)/एडीजी/मायनॉरिटी/२००३/५२८,दि.६ जून,२००३.
४) क्र. २/एनजीसी/२००३/७४३, दि.३ एप्रिल,२००३.
५) क्र.२/एनजीसी/२००३/अल्पसंख्यांक/८५७, दि.२१ एप्रिल,२००३.

उपरोक्त विषयाबाबतची आपली संदर्भाधीन पत्रे पहावीत.

२. आपल्या सदर पत्रांतील प्रस्तावाबाबत आपणास असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याबाबतचे शासनाचे धोरण अद्याप निश्चित झालेले नाही. तथापि, अंतिम धोरण ठरेपर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी (प्रतिवर्षी) अल्पसंख्यांक दर्जा देण्याचे ठरलेले आहे. यास अनुसरून खालील संस्थांना शैक्षणिक वर्ष २००४-०५ करिता खालील अटींच्या अधीन राहून अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्यात येत आहे.

संस्थेचे नांव	अल्पसंख्यांक दर्जाचा प्रकार
१) मेहमूदा शिक्षण व महिला ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था, नागपूर या संस्थेचे मेहमूदा इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, नागपूर.	धार्मिक (मुस्लीम)
२) जामीया इस्लामिया ईशा अतूल उलूम, अक्कलकुवा, जि.नंदूरबार या संस्थेचे जामीया तंत्रनिकेतन, अक्कलकुवा, जि.नंदूरबार.	धार्मिक (मुस्लीम)
३) सेंट झेवियर्स टेक्नीकल इन्स्टिययुट, माहिम, मुंबई. (अशासकीय अनुदानित संस्था)	धार्मिक (रोमन कॅथॉलिक)
४) सेंट फ्रान्सिस इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, बोरिवली, मुंबई.	धार्मिक (रोमन कॅथॉलिक)
५) सूर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशनचे सूर्यदत्ता इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, पुणे.	धार्मिक (जैन)
६) सर्वोदय महिला मंडळ, चंद्रपूर यांचे चंद्रपूर महिला तंत्रनिकेतन, चंद्रपूर.	भाषिक (हिंदी)

३. उपरोक्त संस्थांना खालील अटींच्या आधीन राहून अल्पसंख्यांक दर्जा देण्यात येत आहे.

(१) सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै फाऊंडेशन व इतर विरूध्द कर्नाटक राज्य आणि इतर या न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन स्तरावर विचार विनिमय सुरू असून शासन स्तरावर होणारा निर्णय संस्थेस बंधनकारक राहील.

(२) सर्वोच्च न्यायालयात अल्पसंख्यांक संस्थांबाबत प्रलंबित असलेल्या प्रकरणावर होणारा निर्णय व या अनुषंगाने ठरविले जाणारे शासनाचे निकष संस्थेस बंधनकारक राहतील.

(३) सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशांचे पालन संस्था करते किंवा कसे याबाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण संबंधित विभागीय कार्यालय, कुलसचिव, संबंधित विद्यापीठ/ सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे(पू), मुंबई यांनी संबंधीत संस्थांवर नियंत्रण ठेवावे.

(सु. बा. तुंबारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) कुलसचिव, संबंधित विद्यापीठे.
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण संबंधित विभागीय कार्यालय.
३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे(पू), मुंबई-५१.
४) संबंधित संस्था.
५) निवड नस्ती / तांशि-६.